# फळसेवाडी हितकारी संस्था

## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार 25 मार्च 2017

**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 8. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 2. श्री दशरथ दत्ताराम साटम | 9. श्री अशोक दत्ताराम राणे - अनुपस्थित |
| 3. श्री पांडूरंग सावजी राणे | 10. श्री हेमंतकुमार रमेश राणे – अनुपस्थित |
| 4. श्री सुनिल सदानंद राणे | 11. श्री दिलिप मधुकर राणे - अनुपस्थित |
| 5. श्री उदय भगवान राणे | 12. श्री भरत गणपत राणे – अनुपस्थित |
| 6. श्री रंजन रावजी म्हसकर | 13. श्री उत्तम वामन राणे – अनुपस्थित |
| 7. श्री जयवंत नाना राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेचे कार्यकारीणी समितीची बैठक श्री मंगेश मनोहर राणे यांच्या राहत्या घरी झाली. सभेस एकूण 8 सभासद उपस्थित होते. सचिवांनी उपस्थितांचे अध्यक्षांबरोबर स्वागत केले. त्यानंतर सभेस सुरवात झाली.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी फळसेवाडीतील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी चाललेले त्रिस्तरीय प्रयत्न यावर माहीती दिली. तसेच श्री मंगेश मनोहर राणे यांनी नविन पध्दतीने पाणी शोधणे त्यासाठी त्या स्मितेश तलावडेकर यांनी सांगितलेले खर्च यावर माहिती दिली. चर्चेअंती असे ठरले की संस्थेकडे जमा असलेल्या पैशातून दिनांक 22 किंवा 23 एप्रिल रोजी पैसे खर्च करून पाण्याचा सर्व्हे करणे (10 एकर जमिनीचा सर्व्हे करण्याचा अंदाजित खर्च रु.35,000/-) यांस उपस्थितांनी मंजूरी दिली. ब्राह्मण विहिरीचा पुन्हा एकदा उपसा करुन पाण्याची पातळी पाहणे व नळ योजनेचा विचार करणे.

संस्थेच्या अकाऊन्टवर सन 2014 साली रु.44,000/- शिल्लक होते. संस्थेकडे शिल्लक असलेले रक्कमेपैकी ब्राह्मण विहीर साफसफाईसाठी, पंपखर्च इत्यादींसाठी रु.7,000/- खर्च झाले असून त्यापैकी रु.23,000/- शिल्लक आहेत. एकूण 10 एकर क्षेत्राच्या सर्वेक्षणासाठी रु.35,000/- खर्च आहे ते आपण फळसेवाडी हितकारी संस्था संस्थेच्या अकाऊन्ट मधून खर्च करण्यात येईल.

- वरवडे – फळसेवाडी नळ योजनेची माहिती त्यासंबधी विचार करणे.
- श्री फेज लाईन मिळविण्यासाठी प्रयत्न करणे. श्री फेज लाईन मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी श्री पांडूरंग सावजी राणे यांनी श्री संकेत रत्नाकर राणे यांस संर्पक करावा व पत्रव्यवहार करावा अशी सूचना करण्यात आली.
- आवार – गाडीतळ ते श्री पांडूरंग सावजी राणे यांचे घर इथपर्यंत रस्त्याबद्दल चर्चा झाली. झालेल्या पत्राचाराची माहिती दिली. पिसेकामते विकास मंडळामार्फत पाठपुरावा करण्याचे ठरले. ग्रामपंचायत पिसेकामते यांच्याशी संर्पक ठेवणे.
- वाडीतील स्ट्रीटलाईटबद्दल चर्चा व योजना राबविण्यासाठी वाडीतील लोकांचे सहकार्य घेणे

पुर्नलिखित इतिवृत्त

मुळ दस्तऐवज : MR-02-(74 to 77)

- सर्व कामाच्या पूर्ततेसाठी वाडीतील श्री संकेत रत्नाकर राणे यांची मदत घेणे किंवा त्यांस कमिटीवर घेणे
- दोन महिला सदस्यांची संस्थेवर नेमणूक करणे – प्रतिनिधित्व श्रीमती अनुजा अरुण राणे व श्रीमती आकांक्षा अंकूश राणे यांचे नावावर चर्चा झाली व त्यांची नियुक्ती वार्षिक सभेत घेण्याचे ठरले. तसेच कार्याध्यक्षपदी श्री दशरथ दत्ताराम साटम यांना घेणे असे ठरले.
- वाडीत पाणी, लाईट, रस्ता या गोष्टी जिव्हाळ्याच्या आहेत, या झाल्यानंतर पुढील पिढी वाडीत येईल व पुढे घरांची व जमिनीची सुरक्षा होईल यासाठी प्रत्येकाने झटून काम करावे, नवीन पिढी पुढे आणावी असे ठरले.

त्यासाठी दिनांक 15 एप्रिल 2017 रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे ठरले व परिपत्रक काढण्याचे ठरले. ही कामे पूर्ण करण्यासाठी मा. ना. श्री नारायणराव राणे साहेब आणि आमदार श्री नितेश नारायणराव राणे साहेब यांचेही सहकार्य घेण्याचे ठरले.

या ठिकाणी मिटींगची चहापाणी व्यवस्था श्री मंगेश मनोहर राणे यांच्या कुटूंबियांनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानून रात्री 8:00 वाजता मिटिंग संपन्न झाली.

---